INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF HUMANITIES AND INTERDISCIPLINARY STUDIES
(Peer-reviewed, Refereed, Indexed & Open Access Journal)
DOI : 03.2021-11278686 ISSN : 2582-8568 IMPACT FACTOR : 5.71 (SJIF 2021)

मध्ययुगीन संत साहित्यातील स्त्रीजीवन व संत जनाबाईची स्त्रीवादी भूमिका

मीरा दत्तू गायकवाड

संशोधक

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

E-mail: meera.gaikwad16@gmail.com

DOI No. 03.2021-11278686 **DOI Link ::** https://doi-ds.org/doilink/07.2021-73446668/IRJHIS2107021

प्रस्तावना :

मध्ययूगीन संत साहित्यातील स्त्रीजीवन व संत जनाबाईची स्त्रीवादी भूमिका अभ्यासत असताना दिसून येते की, भारतीय जीवनातील प्राचीन स्त्रीजीवन, मध्ययुगीन स्त्रीजीवन आधूनिक स्त्रीजीवन असे तीन टप्पे येतात.

प्राचीन काळातील स्त्री जीवनात असे दिसून आले की, भारतात वेदपूर्वकाळ हा स्त्रीजीवनाच्या दृष्टीने अनुकूल होता. या काळात स्त्रियांना पुरुषांप्रमाणे समानतेची वागणूक व दर्जा मिळत होता. जसे आज २१ व्या शतकात स्त्रियांना कोणत्याही क्षेत्रात पुरुषांप्रमाणे कौशल्य सिध्द करण्याचा जसा अधिकार मिळाला आहे. स्त्रीवादी चळवळीने त्यांना तो मिळवून दिला आहे. तसाच अधिकार वेदपूर्व काळात स्त्रीयांना होता. त्या काळात स्त्रियांना शिक्षण घेण्याचा अधिकार होता. १६ व्या वर्षापर्यंत मुली शिक्षण घेत त्यानंतर अनुरुप वर, जोडीदार निवडण्याचे सर्व हक्क ही तिला होते. वेदपूर्वकाळात स्त्रीजीवनाचे स्वातंत्र्य अबाधित होते.

प्राचीन काळातील स्त्रियांचा आदर्श स्त्रीवादी भूमिकेला पूरक ठरणारा आहे. कारण स्त्रीवादी भूमिकेची जी मूल्य आज प्रतिपादन केली जातात ती त्या काळातील स्त्रियांनी आपले कर्तृत्व सिध्द करुन दाखविले आहे. स्त्रिवादी भूमिकांची बीजे रोवली गेली ती प्राचीन संस्कृतीतच हे नाकारता येत नाही. परंतु मध्यंतरी म्हणजे मध्ययुगात भारतीय स्त्रीजीवनाला गुलामगिरीच्या खाईत लोटले गेले ते का? व कसे? या प्रश्नांची उत्तरे आपणास पुढीलप्रमाणे पाहता येतील.

उद्दिष्टये :

१. मध्ययूगीन कालखंडातील स्त्रीजीवन स्पष्ट करणे.

२. मध्ययुगीन स्त्रीवादी परंपरेत संत कवयित्रींची भूमिका स्पष्ट करणे.

३. स्त्रीवादासंबंधी इतिहासातील नोंदी अभ्यासणे.

४. मध्ययुगीन संत परंपरा व त्यांचे कार्य समजून येणे.

५. मध्ययूगीन स्त्रीवादी परंपरेतील संत कवयित्रीच्या अभंगाचे स्वरुप अभ्यासणे.

६. मध्ययुगीन कालखंडातील स्त्रीवादी परंपरेतील संत कवयित्री संत जनाबाई यांची स्त्रीवादी भूमिका अभ्यासणे.

७. स्त्रीवादी परंपरेतील संत कवयित्री संत जनाबाई यांच्या अभंगातील स्त्रीजाणिवांचा अभ्यास करणे.

गृहीतके :

१. मध्ययुगीन संत परंपरेत संत कवयित्रींनी आपले स्थान निर्माण केले.

२. मध्ययुगीन काळात बालविवाह, विधवाविवाह त्याज्य, केशवपन, सती जाण्याची प्रथा, पडदा पध्दत होती.

३. मध्ययुगीन स्त्री म्हणजे पुरुषांची मालमत्ता ठरवुन खरेदी विक्रीचा व्यवहारही केला जात असे, या क्रूर प्रथांनी स्त्रियांच्या जीवनात अधिकच नरक यातना सुरु झाल्या.

४. स्त्रीगीते हा स्त्रीच्या जीवनाचा अविभाज्य भाग आहे. दळण, कांडण, कृषिकर्म किंवा सण उत्सव प्रसंगी स्त्री आपले मन मोकळे करीत असे.

५. संत कवयित्रींच्या अभंग निर्मिती स्त्रीगीतांची पार्श्वभूमी लक्षात घेता संत जनाबाईच्या अभंग निर्मितीचे सूत्र सापडते.

६. स्त्री मध्ये असलेली भावुकता–भावनाशीलता, सर्जकता आणि भावोत्कटता यांच्यामुळेच स्त्री ही वाङ्मय निर्मितीत अग्रेसर ठरली.

७. मध्ययुगीन वाङ्मय निर्मिती ही मुळातच धर्मप्रेरणेतून व भक्तीमार्गाने झालेली आहे.

८. मध्ययुगीन काळाच्या समाज जीवनाच्या मर्यादा लक्षात घेऊनही संत कवयित्रींनी स्वत:चे अस्तित्व टिकवून ठेवले व स्वत:चे योगदान निर्माण केले.

मध्ययुगीन स्त्रीजीवन :

मध्ययुगातील स्त्रीजीवन हे प्राचीन स्त्रीजीवन आणि आधुनिक स्त्रीजीवन यांच्या मधल्या काळातील स्त्रीच्या गुलामगिरीचा इतिहास होय.

स्त्रियांच्या गुलामगिरीची सुरुवात मध्ययुगात झाली. प्राचीन काळात स्त्रियांना मिळालेले सर्व हक्क डावलून त्यांना दुबळे मानण्यात आले. स्त्रियांवर पुरूष हक्क गाजवायला लागले पुरूष प्रधान संस्कृतीनेच द्रौपदीच्या निरीला हात घातला. स्त्री ही पुरुषांची मालमत्ता बनली याच भूमिकेतून द्रौपदीला जुगारात पणाला लावले गेले.

स्त्रीच्या दास्याला व गुलामगिरीला पुरूषप्रधान संस्कृतीच कारणीभूत आहे. पूर्वी विवाहसंस्था अस्तित्वात नव्हती. पुरूषसमागमाची तिच्यावर बंधने नव्हती. अतिथीला स्त्री अर्पण करण्याची प्रथा होती.

विवाहसंस्थेच्या उद्यानंतर स्त्रियांवर अनेक बंधने लादण्यात आली. स्त्रियांनी पुरुषांच्या आज्ञेत राहावे. जे सांगतील ते मान्य करावे असा नियमच बनला. पुढे तर लहानवयातच मुलींची लग्न लावण्यात येऊ लागली. ह्या

काळात केशवपन सती जाण्याची प्रथा, पडदा पध्दत सुरू झाली.

मध्ययुगीन काळात स्त्रीवर अनेक बंधने लादण्यात आले. स्त्री ही फक्त आश्रित, अबला म्हणून जीवन जगू लागली. कौटुंबिक व धार्मिक बंधनात तिला अडकविण्यात आले. त्याच्या खाण्यापिण्यावर, लेण्या–नेसण्यावर, गावात फिरण्यावर बंधने घातली एवढयावरच ही पुरूषप्रधान संस्कृती थांबली नाही. स्त्री म्हणजे पुरुषांची मालमत्ता ठरवून तिच्या खरेदी–विक्रीचा व्यवहार ही केला जात असे. समाजातील या काही क्रुर प्रथांनी स्त्रियांच्या जीवनात अधिकच नरक यातना सुरू झाल्या.

मध्युगातील स्त्री जीवनाची दुर्दशा पाहता स्त्री जीवन हे पुरुषी साखळदंडांनी जखडून टाकलेले होते हेच दिसून येते. स्त्रीजीवन म्हणजे चूल आणि मूल या कल्पना विश्वात रमणारे होते. ना शिक्षण, ना स्वातंत्र्य, पती जसा ठेवील, वागवील तसेच राहावे अशी व्यवस्था होती. स्त्रीमुक्ती म्हणजे काय? या संबंधीचा विचारही त्यांना स्पर्श करुन जाणारा नव्हता.

स्त्रियांच्या लेखनाची लिखित पार्श्वभूमी ही संत साहित्यापासून सूरु होते. यादव काळात महाराष्ट्रातील धार्मिक व सामाजिक जीवन लोप पावत चालले होते. समाजात अज्ञान, भीती, अंधश्रध्दा वाढत होत्या. स्त्रियांना धार्मिक बंधनात, व्रत–वैकल्ये, उपवास वगैरे लादून त्यांच्या अस्तित्वावर घाला घातला गेला होता. त्यांना अंधश्रध्देच्या चक्रव्यूहात जखडून ठेवले होते. अशा परिस्थितीत समाजाला योग्य मार्ग दाखवण्याचे कार्य या काळात वारकरी पंथाने केले. स्त्रियांनाही आपल्या पंथात सामील करुन घेऊन त्यांनाही भक्तीचा मार्ग मोकळा केला. त्यांना लेखन, भाषण व कला स्वातंत्र्य देऊन खऱ्या अर्थाने स्त्रीवादी भूमिकांची मुहूर्तमेढ रोवली. स्त्रियांसुध्दा स्वातंत्र्य मिळाल्यास त्या काव्यनिर्मिती करु शकतात.

अशाप्रकारे मराठी स्त्रीकाव्याची सुरुवात मराठी संत स्त्रियांच्या काव्यांपासून सुरु होते. त्या काव्यातून तत्कालीन स्त्रीमुक्तीचे, स्त्रीवादी विचारांचे सूक्ष्म चित्र कळत–नकळत उमटले आहे.

संत जनाबाईचे स्त्रीवादी भूमिका :

मराठी साहित्यात जनाबाई इतकी लोकप्रिय कवयित्री दुसरी आढळत नाही. “नामयाची” दासी म्हणून परीचित असलेली संत जनाबाई ही मूळ परभणी जिल्यातील गंगाखेडची रमा व कुरुंड या विठ्ठल भक्त दांपत्याची मुलगी. संत नामदेवाच्या कुटुंबात पंढरपूर येथे राहण्यास आली आणि पुढे त्याच कुटुंबाची एक सदस्या बनली. संत नामदेवांच्या संगतीत राहिल्यामुळे तिही विठ्ठलभक्तीकडे ओढली गेली.

अवघ्या वयाच्या सातव्या वर्षापासूनच त्यांच्या वाटयाला दास्यत्व आले होते. तेव्हापासूनच त्या संसार, प्रपंच, कुटुंब, प्रेमभाव या संकल्पना त्या स्वप्नपूर्तीतून साकार करीत होत्या. त्यातून स्त्रीवादी बंडखोर वृत्ती, भूमिका व्यक्त होत असे. अक्षर ओळख नसतानाही संत जनाबाईने जे अभंग रचलेल्या अभंगांना स्त्रीवादी विचारांचा सहज स्पर्श झाला आहे. आपल्या कष्टमय जीवनातही कर्तृत्वाचा सुगंध तिने दरवळत ठेवला आहे.

संत जनाबाई कुठेच स्त्री जन्मासंबंधी खंत प्रकट करताना दिसत नाही. जनाबाईच्या वैवाहिक, लौकिक जीवनाचे कोणतेही संदर्भ मिळत नाहीत, तरीही "स्त्रीत्वाची" जाणीव ओझे म्हणून ती बाळगत नाही!

"स्त्री जन्म म्हणूनि न व्हावे उदास ।
साधुसंता ऐसे केले जनी" ।। १।।
संतांचे घरची दासी मी अंकिती ।
विठोबाने दिली प्रेमकळा ।। २।।

आपल्या अभंगातून मातृप्रेम आणि वत्सलभाव चित्रित करीत असतानाच कुठेतरी तिच्या मनात बंडखोरी दडलेली आहे. तिच्या मनातील दबलेल्या रामाचा स्फोट होतो हे तिच्या खालील अभंगातून दिसून येते.

डोईचा पदर आला खांद्यावरी।
भरल्या बाजारी जाईन मी।।
हाती घेईन टाळ खांद्यावरी वीणा ।
आता मज मना कोण करी।।
पंढरीच्या पेढे मांडियले पाल।
मनगटावर तेल घाला तुम्ही।।
जनी म्हणे देवा मी झाले वेसवा।।
रिघाले केशवा घर तुझे।

अशा पध्दतीने संत जनाबाई स्त्रीत्वाची मर्यादा व बंधने झुगारुन सामाजिक मान–मान्यतेला आव्हान देते. डोक्यावरील पदर जरी खांद्यावरी आला तरी मी बाजारात टाळवीणा घेऊन जाईन बघते मला कोण अडवितो किंवा मना करतो असे स्पष्टपणे म्हणते. जनी बंडखोर भाषेत पुरुषांना आव्हान देतांना म्हणते कि दम असेल तर मनगटाला तेल लावा असे म्हणते आणि "मी वेसवा झाले" इतक्या स्पष्टपणे प्रतिष्ठेला हादरा देणारी भाषा १३ व्या शतकात एक स्त्री, तीही "दासी" करते. यातच तिच्या बंडखोर व्यक्तिमत्वाचे दर्शन घडतं. स्त्रीवादी भूमिकेतून व स्त्रीवादी दृष्टीकोनातून जनाईच्या अभंगाचा अभ्यास करता येतो.

संत जनाबाई प्रत्यक्ष परमेश्वरालाही शिव्या घालण्यास कमी करीत नाही. ती म्हणते–

"अरे विठया विठया। मूळ मायेचा कारटया।
तुझे गेले मढे। तुला पाहूनि काळ रडे।
तुझी रांड रंडकी झाली।
जन्मसावित्री चुडा ल्याली।।"

असे म्हणून ती अंगणात उभी राहून शिव्या देते. यातील भाषा एकदम आक्रमक आहे. हेच तिच्या बंडखोर प्रवृत्तीचे लक्षण असून प्रत्यक्ष परमेश्वरालाही ती आपल्याबरोबर कामाला जुंपते. यातून तिला स्त्री–पुरुष समानतेचा धागा गुंफायचा आहे. स्त्री–पुरुष भेद तीला ही मान्य नाही. एक प्रेमळ, आर्त, हळुवार तरीही बंडखोर व वास्तवाचे भान ठेवणारी विठ्ठलमय होणारी, उपेक्षित स्त्री मनाचे व दासीपणाचे शल्य उरात ठेवणारी आणि वेळ पडल्यास विठ्ठलाही शिव्या देणारी बंडखोर जनी अशाप्रकारे १३ व्या शतकातील संत जनाबाईच्या काव्यातून स्त्रीवादी भूमिका अविष्कृत झालेली दिसून येते.

समारोप :

स्त्रीवादी परंपरा व संत कवयित्री ही आजही तितकीच महत्वाची आहे. संतांनी अंधश्रध्देचा नेहमीच विरोध केला आहे. संतांनी जो धर्म स्वीकारला तो कर्मकांड रुढी, परंपरा, अंधश्रध्दा यांना नाकारणारा होता संतांनी धर्मापेक्षा कर्माला महत्व दिले आहे. भारतीय संस्कृतीच्या जडणघडणीत स्त्री कवींचे योगदान विशेष असे आहे. साहित्यिक व वाङ्मयीन दृष्टया स्त्रीयांची कामगिरी लक्षणीय आहे. 'धर्म' हेच केंद्र असल्याने याचा प्रभाव स्वाभाविकच रुढी, परंपरा तसेच जीवनावर होता. त्यामुळे जातीय चौकट अधिक पक्की झाली. परंतू संतांनी जातीयतेचे सर्मथन कधीच केले नाही ही बाब लक्षात घ्यावी लागेल. आजच्या काळातही याची गरज आहे.

संदर्भ :

१) संत जनाबाई चरित्र व काव्य, डायमंड पब्लिकेशन, श्री संत जनाबाई शिक्षण संस्था, गंगाखेड, दुसरी आवृत्ती.

२) डॉ. सदाशिव सरकटे, स्त्रीवादी भूमिका व काव्य,

३) विद्यासागर पारंगणकर, संतकवयित्रीचा अभ्यास, साहित्य अकॅडमी

४) डॉ. गीता गवस, मराठी कवितेतील स्त्रीवादी जाणीव,
दर्या प्रकाशन, पुणे, ३ मार्च २०१८

५) प्रा. एल.जी. सोनवणे, मध्ययुगीन साहित्य (अवलोकन आणि निरीक्षणे)
प्रशांत पब्लिकेशन, ८ फेब्रुवारी २०१५

६) आजगावकर जगन्नाथ रघुनाथ, जनाबाई, महाराष्ट्र कविचरित्र, भाग पहिला, दामोदर सावळाराम आणि मंडळी, मुंबई, आवृत्ती दुसरी, १९२९

७) इनामदार हेमंत विष्णू, समर्थांची दासी संत जनाबाई, भक्तिपंथ: नवचिंतन, फडके बुकसेलर्स, कोल्हापूर, १९७७

८) इर्लेकर सुहासिनी, म्हणे नामयाची जनी (लेख), प्राचीन मराठी संत कवयित्रींचे वाङ्मयीन कार्य, परिमल प्रकाशन, औरंगाबाद, १९८०